


# हॅलो प्रभात

नवे विचार... नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : संजीव शाळगावकर

■ मुंबई ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

2026

"नव्या वर्षात नवी उमेद, नवी स्वप्ने आणि नवा उत्साह!"

नूतन वर्षाभिनंदन

पुणे • वर्ष : ०६ • अंक : २६८ • गुरुवार, दि. ०१ जानेवारी २०२६ • किंमत : ३ रूपये • पाने : ४


# महापालिकांसाठी 'भाजपा'चा 'मेगा प्लॅन'!

## २९ पैकी किमान २२ महापालिका जिंकणार? : फडणवीस यांच्या झंझावाती सभांचे आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रात सगळीकडे महानगरपालिकांच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. महायुती आणि महाआघाडी मध्ये फारसे 'आलबेल' नाही. तरीदेखील भारतीय जनता पार्टीने २९ पैकी किमान २२ महानगरपालिका जिंकण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असून त्यासाठी 'मेगा प्लॅन' तयार झाला आहे. महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास प्रामुख्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर असल्याने त्यांच्या जास्तीत जास्त झंजावाती सभांचे आयोजन सर्वत्र करण्यात येणार आहे.



राज्यातील आगामी महापालिका निवडणुकांसाठी आता राजकीय वातावरण तापायला सुरुवात झाली आहे. या निवडणुकांमध्ये मुख्यमंत्र्यांच्या सभा महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. मुख्यमंत्री फडणवीस हे आगामी १० दिवसांत जवळपास ४० ते ४५ प्रचार सभा घेणार आहेत. प्रत्येक महापालिकेसाठी या सभांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यांच्या या झंझावाती दौऱ्यांमध्ये भारतीय जनता पार्टीचे आक्रमक व्हीजन, सरकारने केलेली लोकोपयोगी कामे, महिला शेतकरी आणि तरुणांसाठी आणलेले अनेक प्रकल्प यांचा लेखाजोखा मांडला जाण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री फडणवीस हे इतर पक्षांवर टीका करण्याच्या भानगडीत पडणार नाहीत, तर त्यांचा भर विकास कामांवरच असेल. मोठ्या महानगरपालिकांमध्ये सुमारे तीन ते चार सभांचे आयोजन केले जाईल, तर छोट्या महापालिकांमध्ये प्रत्येकी एक सभा पार पडणार आहे, असेही सांगण्यात येते.

### मुख्यमंत्र्यांच्या दररोज दहा सभा

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही मुख्यमंत्र्यांनी मोठ्या प्रमाणात सभा घेतल्या होत्या. आता महापालिका निवडणुकांमध्येही तेच चित्र दिसणार आहे. दिवसाला सुमारे १० सभा घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, ज्यामुळे प्रचाराला वेग येईल. हे नियोजन आगामी निवडणुकांमध्ये भाजपा आणि मित्रपक्षांना ताकद देणारे ठरू शकते**

मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे, नवी मुंबई, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये दोनहून अधिक सभांचे नियोजन करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त भाजपाचे इतर फायर ब्रँड नेतेही आणि जाहीर करण्यात आलेले स्टार प्रचारकही सर्व मतदार संघ पिंजून काढतील. युतीमधील अन्य दोन घटक पक्षापेक्षा आणि महाआघाडीपेक्षा भाजपाच्या जास्तीत जास्त सभा होतीील.

## लोकवस्तीत बिबट्याचा थरार ; गोठ्यात घुसून वासराचा फडशा!

**पुणे : हॅलो प्रभात**

गोठ्यात दावणीला बांधलेल्या वासरावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना हवेली तालुक्यातील लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील बाजार मळा परिसरात बुधवार (३१ डिसेंबर) रोजी सकाळी उघडकीस आली आहे. यामध्ये वासराचा जागीच मृत्यू झाल्याने शेतकऱ्याचे सुमारे ५९ हजारांपेक्षा जास्त रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेने परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे निदर्शनास आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.अमृत विठ्ठल काळभोर असे नुकसान झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. काळभोर यांचा बाजारमळा, जिल्हा परिषद शाळेच्या जवळ गायींचा गोठा आहे.नेहमीप्रमाणे मंगळवारी रात्री ५ गाई व ३ ते ४ महिन्यांचे १ वासरु असे गोधन गोठ्यात बांधले होते.

रात्री दहा वाजता काळभोर गोठ्यातील कामे आटोपून घरी गेले होते. मंगळवारी रात्री बिबट्याने सुमारे सहा फुट भिंतीवरून गोठ्यात प्रवेश केला आणि दावणीला बांधलेल्या वासरावर हल्ला केला परंतु, वासरू बाधलेले दावे मजबूत होते ते तुटले नाही परिणामी बिबट्याला वासरू घेऊन जाता आले नाही.परंतु त्याच्या हल्ल्यात वासरू जाग्यावरच मृत्युमुखी पडले.काळभोर हे बुधवारी सकाळी गोठ्यात गेले तेव्हा त्यांना सदर प्रकार निदर्शनास आला.

## 'काँग्रेसमुक्त भारत'ची वल्गणा करणारा 'कार्यकर्ता मुक्त भाजपा' झाला

**हर्षवर्धन सपकाळ**

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षात अराजकाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पक्षासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना बाजूला सारून दुसऱ्या पक्षातील आयत्यावेळी आलेल्यांना भाजपाने उमेदवारी दिल्याने निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप आहे. भाजपामध्ये ही नाराजी राज्यभर सर्वदूर दिसत असून 'काँग्रेसमुक्त भारत' करण्याची वल्गना करणारा भाजपा 'कार्यकर्तामुक्त भाजपा' झाला आहे, असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, नगरसेवकपदासाठी भाजपामध्ये प्रचंड गोंधळ माजल्याचे चित्र दिसत आहे आणि हेच चित्र आगामी विधानसभा निवडणुकतही दिसेल. मुळ भाजपा व संघाच्या कार्यकर्त्यांना बाजूला सारून उपऱ्यांच्या हाती भारतीय जनता पक्ष गेल्याने लवकरच या पक्षाचे नियंत्रण हे नागपूरच्या रेशिमबागेतून नाही तर अदानी अंबानी यांच्याकडून होईल, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबद्दल बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, गुंडांचाच पक्ष आहे तो, याआधी त्यांनी माफियांना प्रवेश देण्यात आला, मराठवाड्यात एका वरळी किंगला पक्षात प्रवेश दिला. कोयता गँगशी संबंधित लोक त्यांच्या पक्षात आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील भावाच्या शेतातील ड्रग्ज कंपनीचा वितरक हा अजित पवार यांच्या पक्षाचा कार्यकर्ता असल्याचे दिसून आले असे सपकाळ म्हणाले.

### नवीन वर्षाचा संकल्प


**२०२६ हे वर्ष काँग्रेससाठी संघटनात्मक वर्ष आहे आणि त्याची तयारी डिसेंबर महिन्यापासूनच झाली आहे. काँग्रेसचे हौसले बुलंद आहेत, पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात होत आहेत. वैचारिक कटीबद्धता आहे आणि वैचारिक मेळ व मूठ बांधण्याचे काम नवीन वर्षात करणार आहे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.**

## भाजप- सेनेला धक्के, पिंपरीत ५ उमेदवारांचे एबी फॉर्म बाद

### उमेदवारांना अपक्ष निवडणूक लढवावी लागणार

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकांसाठी अर्ज छाननी प्रक्रियेला सुरुवात झाली असून अनेक ठिकाणी आक्षेप घेतल्याने उमेदवारांचे अर्ज बाद ठरत आहेत. मुंबईतील दोन प्रभागात भाजप उमेदवारांचे अर्ज बाद झाल्यानंतर आता पिंपरी चिंचवडमध्येही भाजपच्या तीन उमेदवारांना फटका बसला आहे. पिंपरी चिंचवडमध्ये भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. येथील प्रभाग 24 मधील भाजपच्या तीन जागेवरील आणि शिंदेंच्या शिवसेना पक्षातील दोन उमेदवारांचे एबी फॉर्म बाद ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे, आता येथील उमेदवारांना अपक्ष निवडणूक लढवावी लागणार आहे.



शिवसेना खासदार श्रीरंग बारणेंच्या प्रभागात युतीत स्वबळावर लढणाऱ्या दोन्ही पक्षांना हा मोठा फटका बसलाय. अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर हे पाचही एबी फॉर्म जमा झाले होते. त्यावर विरोधी उमेदवारांनी आक्षेप घेतला होता. त्यामुळे आजच्या छाननीमध्ये एबी फॉर्म बाद ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे, पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला मोठा फटका बसला आहे. आता, या जागेवर पाचही उमेदवारांना अपक्ष म्हणून निवडणूक लढवावी लागणार आहे. आता हे पाहता प्रभाग 24 मध्ये कमळ चिन्हाचा फक्त एकचं उमेदवार असेल तर शिंदे शिवसेनेचे दोन उमेदवार धनुष्यबाण या चिन्हावर लढतील. त्यामुळे, येथील भाजप आणि शिवसेना उमेदवारांसाठी स्वतंत्र प्रचार यंत्रणा राबवावी लागणार असून पक्षाच्या उमेदवारांची चांगलीच गोची झाल्याचं पाहायला मिळत आहे.

मुंबईतील वॉर्ड क्रमांक 211 मध्ये भाजपच्या उमेदवाराचा अर्ज हा कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे स्वीकारण्यात आला नाही. खुल्या प्रवर्गातील वॉर्ड क्रमांक 211 मध्ये भाजपने शकील अन्सारी यांना उमेदवारी दिली होती. तर वॉर्ड क्रमांक 212 मध्ये भाजपच्या उमेदवार मंदाकिनी खामकर यांचा उमेदवारी अर्जही स्वीकारण्यात आला नव्हता. मंदाकिनी खामकर यांना एबी फॉर्म मिळाल्यानंतर त्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी कार्यालयात 15 मिनिटं उशीरा पोहोचल्या. त्यामुळे निवडणूक आयोगाने भाजपच्या मंदाकिनी खामकर यांचा उमेदवारी अर्ज स्वीकारला गेला नाही. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी भाजपने एकप्रकारे अर्जच भरलेले नाहीत. त्यामुळे भाजपने या दोन वॉर्डांमध्ये इतर पक्षांना बाय दिल्याची चर्चा आहे. मुंबई महापालिकेसाठी शिवसेना ठाकरे गटाची धाकधूक वाढली असून त्यांच्या 5 उमेदवारांच्या उमेदवारी धोक्यात असल्याचं दिसून येतंय. शिंदेंच्या शिवसेनेने ठाकरेंच्या पाच उमेदवारांच्या अर्जावर शिंदे गटाने आक्षेप घेतला आहे.

## कुछ कह गए, कुछ सह गए..कुछ कहते कहते रह गए

**पुणे : हॅलो प्रभात**

■ भाजपा खासदार मेधा कुलकर्णींचा संताप



महापालिकांच्या निवडणूक तिकीट वाटपा बाबत राज्यभरात भाजपच्या अनेक निष्ठावंतांचा संताप बघायला मिळाला. अनेक वर्षांपासून काम करत असताना पक्षाने बाहेरून आलेल्यांना महापालिकांमध्ये उमेदवारी दिल्याने बराच गोंधळ झाला. यावरून ठिकाणी पक्षाबद्दलची नाराजी व्यक्त केली गेली. यावर यांनीही नाराजी व्यक्त करत पक्षाला सुनावले आहे. उमेदवार अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आणि अर्ज छाननीच्या दिवशी भाजपाच्या इच्छुक उमेदवारांचा संताप बघायला मिळाला. छत्रपती संभाजीनगरमध्ये तर आत्मदहनाचा प्रयत्न झाला. मंत्री अतुल सावे, माजी मंत्री भागवत कराड यांच्या गाड्यांना घेराव घातला गेला. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नेत्यांच्या गाड्या काळ्या केल्या. त्यांच्या फोटोंना काळे फासले. अशा प्रकारची राज्यातील अनेक महापालिकांमध्ये ही दृश्य बघायला मिळाली. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाच्या या भूमिकेबद्दल खदखद व्यक्त करत पक्षाला आणि स्थानिक नेत्यांना सवाल केले. यात आता भाजपाच्या खासदार आणि माजी आमदार यांनीही उडी घेतली आहे.

# कल्याण-डोंबिवलीत भाजपने खाते उघडले

**ठाणे : हॅलो प्रभात**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मोठा दिलासा मिळाला आहे. कल्याण पूर्वेतील प्रभाग क्रमांक 18-अ मधून भाजपाच्या रेखा राजन चौधरी यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. तसेच, डोंबिवलीतील प्रभाग क्रमांक 26-क मधून आसावरी केदार नवरे यांचाही एकमेव अर्ज दाखल झाल्यानं या दोन्ही महिला उमेदवार बिनविरोध निवडून आल्या आहेत. या बिनविरोध विजयाची माहिती भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली आहे. मतदानापूर्वीच भाजपानं कल्याण-डोंबिवलीत खातं उघडलं. भाजपानं केडीएमसीमध्ये खातं उघडलं. खरं तर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत भाजपाला मतदानापूर्वीच मोठा दिलासा मिळाला आहे.



31 प्रभागांतील एकूण 122 जागांसाठी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत होती. या कालावधीत प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनी मोठ्या संख्येनं अर्ज दाखल केले. मात्र, कल्याण पूर्वेतील प्रभाग क्रमांक 18-अ (नागरिकांचा मागास प्रवर्ग - महिला राखीव जागा) साठी भाजपाच्या महिला जिल्हाध्यक्ष रेखा राजन चौधरी यांच्याशिवाय अन्य कोणाचाही अर्ज दाखल झाला नाही. त्यामुळे या जागेवर त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

प्रभाग क्र. १८ मधून रेखाताई चौधरी आणि प्रभाग क्र. २६-क मधून आसावरीताई केदार नवरे यांचा नगरसेविका पदी बिनविरोध विजयी झाल्या.

तसेच, डोंबिवली पूर्वेतील प्रभाग क्रमांक 26-क (ज्यामध्ये राजाजी पथ, शिव मार्केट, रामनगर, सावरकर रोड ) मधून भाजपाच्या आसावरी केदार नवरे यांचाही एकमेव अर्ज दाखल झाला असून, त्यांचीही बिनविरोध निवड झाली आहे.

यासोबतच, भाजपाच्या रंजना पेडणेकर या डोंबिवलीतील प्रभाग क्रमांक 26 ब मधून बिनविरोध निवडून आल्या आहेत. या तिन्ही बिनविरोध विजयांमुळे भाजपने निवडणुकीपूर्वीच आपलं खातं उघडलं आहे. अशा स्थितीत आतापर्यंत केडीएमसीमध्ये भाजपच्या तीन महिला उमेदवारांच्या बिनविरोध निवडीमुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि जल्लोषाचे वातावरण आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (केडीएमसी) निवडणुकीसाठी 31 प्रभागांतील एकूण 122 जागांसाठी मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत होती. या कालावधीत एकूण 860 उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे. सकाळी 9 वाजल्यापासूनच इच्छुक उमेदवारांनी आपल्या समर्थकांसह ढोल-ताशे, झेंडे आणि घोषणाबाजी करीत वाजतगाजत मिरवणुका काढल्या. यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या परिसरात प्रचंड गर्दी उसळली होती. कार्यकर्त्यांच्या उत्साहानं आणि राजकीय पक्षांच्या रंगीबेरंगी झेंड्यांनी परिसर पूर्णतः राजकीय रंगात रंगला होता. या निवडणुकीत शिवसेना, भाजपा, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पार्टी तसेच, अपक्ष उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. 9 वेगवेगळ्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये अंतिम क्षणापर्यंत इच्छुक उमेदवारांना प्रवेश दिल्यानं अर्ज भरण्याची प्रक्रिया सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होती.

## संक्षिप्त...



### आरोपीवर गोळीबार

**पुणे : हॅलो प्रभात**

पुण्यातल्या जर्मन बेकरी स्फोटातील आरोपीवर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे ही घटना घडली. बंटी जहागिरदार असं या आरोपीचं नाव आहे. दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी त्याच्यावर गोळ्या झाडल्या. १३ फेब्रुवारी २०१० रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या दरम्यान पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील प्रसिद्ध 'जर्मन बेकरी'मध्ये भीषण बॉम्बस्फोट झाला होता. संपूर्ण देशाला हादरवून टाकणारा हा एक मोठा दहशतवादी हल्ला होता. या स्फोटात एकूण १८ लोकांचा मृत्यू आणि ६० हून अधिक जण जखमी झाले होते. 'इंडियन मुजाहिद्दीन' या दहशतवादी संघटनेने 'लष्कर-ए-तैयबा'च्या मदतीने हा स्फोट घडवून आणल्याचं तपासामध्ये स्पष्ट झालं होतं.

### कंटेनर थेट दुकानात; व्यवसायिक ठार

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे सोलापूर महामार्गावर पाटस (ता. दौंड) हद्दीत चालकाचा ताबा सुटल्याने कंटेनर थेट भंगार दुकानात घुसल्याने भंगार व्यवसायिकाचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. अखिलेश तुळशीराम सोनकर (वय २५) मूळ राहणार जनपद उत्तर प्रदेश असे मृत्युमुखी पडलेल्या व्यवसायिकाचे नाव आहे. याबाबत मुकेश कुमार सोनकर यांनी पाटस पोलीस चौकीत फिर्याद दिली. त्यानुसार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फणसे यांनी माहिती दिली. पाटस हद्दीत पुणे सोलापूर महामार्गा लगत बारामती फाटा येथे एका खाजगी क्षेत्रात सोनकर यांचे भंगाराच्या साहित्याचे दुकान- शेड आहे. दुकानात सोनकर व इतर चार जण काम करीत असतात. मंगळवारी रात्री जेवण उरकून पाच जण नेहमीप्रमाणे शेडमध्ये झोपले. बुधवारी मध्यरात्री पुणे दिशेकडे भरधाव वेगात जाणारा कंटेनर थेट सोनकर यांच्या दुकानात घुसला.

### एक लाखांची लाच; महिला ताब्यात!

**पुणे : हॅलो प्रभात**

भूसंपादन प्रकरणात निकाल झाल्यानंतर त्याची प्रत देण्यासाठी शेतकऱ्याकडे एक लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी उपजिल्हाधिकारी भूसंपादन कार्यालयात कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या सेवानिवृत्त मंडल अधिकारी महिलेला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ताब्यात घेतले आहे. सुनंदा अशोक वागसकर (येवले) असे ताब्यात घेण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत एका शेतकऱ्याने एसीबीकडे तक्रार दिली होती. विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे शेतकरी आहेत. त्यांच्या ६२ वर्षांच्या मामे बहिणीच्या वडिलोपार्जित जमिनीच्या वाटपपत्र नोंदीसंबंधीचा दावा उपजिल्हाधिकारी भूसंपादन विभागात दाखल आहे. या दाव्यात नुकताच निकाल झाला होता. त्या निकालाची प्रत देण्यासाठी वागसकर यांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली. तक्रारदाराकडून सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर पडताळणी दरम्यान ही रक्कम वाढवून स्वतःसाठी आणि उपजिल्हाधिकारी यांच्या नावे एकूण एक लाख रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

# संपादकीय

## राजकारणाचा नुसता चुथडा

महापालिकांच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याचा मंगळवारी अखेरचा दिवस होता. भारतीय जनता पक्ष , एकनाथ शिंदे यांची शिवसेना तसेच उबाठा सेना , अजित पवार यांच्या पक्षातील निष्ठावंतांनी ज्या प्रकारे आक्रोश, हलकल्लोळ आणि तीव्र नाराजी व्यक्त केली, त्यावरून राज्यतले राजकारण इतके वाईट कधीच नव्हते, असे म्हणण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे काही दिवसांपूर्वी भारतीय जनता पक्षावर टीका करताना, कोण कुठल्या पक्षात आहे हे कळतच नाही, आज इथं तर उद्या तिथं, कसं लक्षात ठेवायचं.. हा डायलॉग मारत टाळ्या आणि हशा वसूल करायचे. आज ते ज्या उबाठा शिवसेनेबरोबर आहेत, त्यातली मंडळी कुठे आहेत आणि त्या पक्षात कोण आले, याची मोजदाद कशी ठेवणार? हे त्यांनीच सांगावे. 'दुसऱ्याचे पाहायचे वाकून आणि आपले ठेवायचे झाकून, ही मनोवृत्ती राज ठाकरे यांना सोडावी लागणार आहे.

**राज ठाकरे यांच्याकडे गमावण्यासारखे काय?**

एक वेळ अशी होती की राज ठाकरे यांच्याकडे गमावण्यासारखे काहीच नव्हते. 'उठ दुपारी आणि घे सुपारी' हा त्यांच्या उपजीविकेचा व्यवसाय होता. याबाबत उबाठाच्या प्रवक्त्या फायरब्रॅन्ड नेत्या सुषमा अंधारे यांनी जाहीर सभेत राज ठाकरे यांच्यावर याच वाक्यात निशाणा साधला होता. त्याला ना उद्धव ठाकरे ना राज ठाकरे उत्तर देऊ शकले आहेत. आता गमावण्यासारखे काही नाही, ही वस्तुस्थिती कायम आहे. मात्र, आता सुपारी मिळणेही बंद होणार आहे. दुपारी उठा किंवा सकाळी सुपारी देणारे भाजप किंवा काँग्रेस व्हाया शरद पवार आता आपल्या अस्तित्वासाठी लढत आहेत. या दोन भावांच्या नादाला लागलो, तर आपल्याकडे आहे ते ही संपेल ही भीती शरद पवार , काँग्रेसला आहे. त्यातून राज ठाकरे यांचा अंदाज येणे अवघड आहे. ते कोणत्या क्षणी कोणाकडून जातील, हे सांगणे अवघड आहे. कोणतेही सत्त्व, तत्त्व, विचार नसलेले मात्र आपण विचारवन्त आहोत, हे दाखवण्यात अट्टल असणारे राज ठाकरे केवळ गर्दी जमवायला भाजप आणि काँग्रेसने वापरले. मात्र गर्दीचे रूपांतर मतात होत नाही हे लक्षात आल्यावर राज ठाकरे यांचे आयटम सॉन्ग म्हणजेच भाषण सुपारीवर ठेवायला, हे दोन्ही पक्ष आता तयार नाहीत. आघाडी करायला तयार नाहीत. परस्पर होईल ते होऊ दे, अशा मुद्द्यावर ते येऊन थांबले आहेत.

एकवेळ डॉ. बाळासाहेब आंबेडकर परवडले. मात्र, राज ठाकरे नको ही काँग्रेसची स्पष्ट भूमिका आहे. साहजिकच उद्धव ठाकरेही आघाडीपासून दूर फेकले गेले आहेत. भाजपची अवस्था तर फारच अवघड आहे. हव्यासापोटी विरोधी पक्षातील ज्यांना भाजपत घेतले, त्यांना उमेदवारी दिली. आता निष्ठावन्त भाजपतून बाहेर पडण्याच्या परिस्थितीत आहेत. आ. देवयानी फरांदे ते अगदी पहिल्यांदा उमेदवारी मागणाऱ्यांची मंगळवारची अवस्था पाहिली तर निष्ठावंतच आता भाजपला 'कुठे नेऊन ठेवला भाजप माझा?' असे म्हणत आहेत. विरोधी पक्ष अस्तित्वातच नको ही भाजपची पाशवी भूमिका त्यांनी आता तरी बदलली पाहिजे. विरोधक नेस्तनाबूत होणे सोपे नाही आणि सोबत जे इतर पक्षातले नेते, कार्यकर्ते सध्या आहेत तेच एक दिवस विरोधक म्हणून समोर येतील, विरोधात उभे रहातील यात शंका नाही.


**भाजपाची व्यूहरचना काय?**

भाजपचे अजूनही सोशिक असलेले निष्ठावन्त इतर पक्षातले जे नेते भाजपत आलेत आणि त्यांना उमेदवारी मिळाली आहे, त्यांची बाबत बाजू लावून धरत भाजपची ही जबरदस्त व्यूहरचना आहे याचे कौतुक करत आहेत. हे ढोंग आहे. आपल्याला मिळत नाही आणि आपल्याबरोबर आलेल्यांनाही मिळत नाही, याचा असुरी आनंद आहे. मात्र, हा आनंद फार काळ टिकणारा नाही. राजकारणाचा जो विचका सुरु झाला आहे, तो थांबवणे अवघड असले तरी अशक्य नाही. राजकारण करताना किमान आचार संहिता, विचार सुचिता आणि कृतिशील नियमितता पाळणे वश्य आहे. ते भाजपने पाळले पाहिजे. पण दुसऱ्यांना ही पाळायला भाग पडले पाहिजे. यात पुन्हा एकदा सत्ता मिळवण्यासाठी शरद पवार यांनी सत्तेपर्यंत जाणारी पाऊल वाट २०१९ सालात शिवसेना फोडून निर्माण केली त्याचा भाजपने आठोपदरी महामार्ग केला आहे. त्यामुळे राजकारण इतके वाईट कधीच नव्हते, असे म्हणायची वेळ आली आहे. निवडणुकांनंतर काय ती दिशा निश्चित कळेल एवढेच.

# 'युद्धबंदी' वर आता ट्रम्पनंतर चीनचाही खोटेपणा

**पुणे : हॅलो प्रभात**

अनेक जागतिक संघर्षात चीनने मध्यस्थाची भूमिका बजावली, असा दावा चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी केला होता. भारत-पाकिस्तान युद्धाचा उल्लेखही त्यांनी केला. मात्र त्यावर आता भारताने या खोटारडेपणाचा बुरखा टराटरा फाडला आहे.



पहलगाम हल्ला, त्यानंतर झालेलं ऑपरेशन सिंदूर आणि भारत-पाकिस्तान दरम्यान झालेली युद्धबंदी यावरून आत्तापर्यंत बरंच काही बोललं गेलं आहे. त्यावरून झालेल्या राजकारणानेही तीव्र वळण घेतलं होतं. आधी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धबंधीचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला होता. भारत-पाकिस्तान दरम्यान शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपणच मध्यस्थी केली, यात मोठी, महत्वाची भूमिका केली अशा एक ना अनेक वल्गना ट्रम्प यांनी केल्या होत्या. मात्र भारताने त्यांच्यासमोर न झुकता ट्रम्पचे दावे थेट फेटाळून लावले आणि हा केवळ दोन्ही देशांमधील मुद्दा असल्याचे थेट स्पष्ट केलं होतं. कोणत्याही स्तरावर कोणत्याच तिसऱ्या देशाची काहीही भूमिका नव्हती आणि ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने स्वतः भारताकडून युद्धबंदीची मागणी केली होती असंही भारतातर्फे ठणकावून सांगण्यात आलं होतं.

**चीनच्या विधानानंतर भारतातर्फे स्पष्टीकरण :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दाव्याचा पुनरुच्चार करत आता चीननेही यात उडी मारली आहे. भारत आणि पाकिस्तानमधील शांतता चर्चेचा मध्यस्थ म्हणून आपण काम केल्याचा दावा चीनने केला असून आता भारताने पुन्हा आपली बाजू स्पष्ट केली आहे. भारत-पाकिस्तान संघर्षासह अनेक जागतिक संघर्ष सोडवण्यात बीजिंगने भूमिका बजावली आहे असं चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी अलिकडेच एका निवेदनात म्हटलं होतं.

**भारताची भूमिका नेहमी स्पष्ट :** मध्यस्थीबाबत भारताची भूमिका नेहमीच स्पष्ट राहिली आहे असं सरकारी सूत्रांनी सांगितल्याची माहिती समोर आली आहे. ऑपरेशन सिंदूर नंतर कोणतीही मध्यस्थी झाली नाही. भारत आणि पाकिस्तान दरम्यान तिसऱ्या पक्षाच्या किंवा तिसऱ्या देशाच्या हस्तक्षेपाला जागा नाही याचा भारताने पुनरुच्चार केला. युद्धबंदीसाठी पाकिस्ताननेच भारताच्या डीजीएमओशी संपर्क साधला होता असंही स्पष्ट करण्यात आलं.

**चीनने काय केला दावा? :** बीजिंगमध्ये एका परिसंवादाला संबोधित करताना चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी म्हणाले की, या वर्षी जगात अनेक स्थानिक युद्धे आणि सीमापार संघर्ष झाले. चीनने म्यानमार, इराणचा अणुप्रश्न, भारत-पाकिस्तान तणाव, पॅलेस्टाईन-इस्रायल संघर्ष आणि कंबोडिया-थायलंड वाद यासारख्या बाबींमध्ये मध्यस्थी केली असा दावा त्यांनी यावेळी केला. मात्र भारताने हे दावे साफ फेटाळून लावले आहेत.

### परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकृत निवेदन


**13 मे 2025 रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत, परराष्ट्र मंत्रालयाने हे स्पष्टपणे सांगितलं होतं की, दोन्ही देशांच्या डीजीएमओंमधील चर्चेत युद्धबंदीची तारीख, वेळ आणि संज्ञा निश्चित करण्यात आली होती. या प्रक्रियेत इतर कोणत्याही देशाची भूमिका नसल्याचेही मंत्रालयाने स्पष्ट केलं होतं.**

# शिवाजी 'गदादे'यांच्यावर गदा

### प्रचार महागात पडला..! आचारसंहिता भंगाचा गुन्हा

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत मंगळवारी संपली. त्याआधीच टेम्पो व रिक्षावर बॅनर लावून प्रचार सुरू करणाऱ्या राष्ट्रवादी (अजित पवार)चे शिवाजी गदादे पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक २८ जनता वसाहत, हिंगणे खुर्दमध्ये शिवाजी गदादे पाटील यांच्या कन्या प्रिया गदादे या राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्याकडून निवडणुकीला उभ्या आहेत. याबाबत आरोग्य निरीक्षक ललिता तमनर यांनी पर्वती पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तमनर यांची प्रभाग २५, २७, २८मध्ये भरारी पथक प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहिता भंग होणार नाही, याची काळजी घेणे, निवडणूक विषयक तक्रारींचे निराकरण करणे, हे या गटाचे काम आहे. २८ डिसेंबरला दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास पर्वती पायथा रोड येथील गदादे पाटील यांच्या कार्यालयासमोर कॅनॉल पुलावर आचारसंहितेचा भंग झाल्याची तक्रार मिळाली होती. त्यानुसार भरारी पथकाने तेथे भेट दिली. त्या ठिकाणी टेम्पोवर राष्ट्रवादीची निशाणी घड्याळाचे चिन्ह व शिवाजी गदादे पाटील यांचे इतर राजकीय नेत्यांचे फोटो होते. तसेच दोन रिक्षांना होडीचा आकार दिलेले बॅनर, असाच मजकूर असलेले बॅनर लावलेले व स्पिकरचे भोंगे लावलेल्या दोन रिक्षा दिसून आल्या.



# पुण्यात उमेदवाराने चक्क एबी फॉर्म फाडला

■ शिवसेनेत अंतर्गत वाद भडकला

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धनकवडी सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत गेल्या दोन दिवसांपासून राजकीय वातावरण तापले आहे. उमेदवारी आणि एबी फॉर्मच्या मुद्द्यावरून मोठा गोंधळ उडाल्याचे चित्र बुधवारी समोर आले. प्रभाग क्रमांक ३६ (अ) मध्ये उमेदवारीवरून राजकीय राडा झाला असून शिवसेना शिंदे गटातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. पक्षाकडून देण्यात आलेला एबी फॉर्म शिवसेनेचे उद्धव कांबळे यांनी चक्क फाडून टाकल्याची खळबळजनक घटना घडली. एकाच प्रभागात दोन उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला. याच पार्श्वभूमीवर मच्छिंद्र ढवळे यांचा एबी फॉर्म हिसकावून घेऊन तो फाडून टाकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला. कायदा व सुव्यवस्था भंग केल्याप्रकरणी उद्धव कांबळे यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली. या प्रकारामुळे शिवसेनेच्या स्थानिक नेतृत्वावर टीका होत असून उमेदवारी वाटपातील गोंधळ आणि अंतर्गत विसंवाद पुन्हा एकदा उघड झाला आहे. प्रभाग ३६ (अ) मधील मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण असून पुढील राजकीय घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नववर्षाच्या स्वागतासाठी शहर सज्ज; थर्टी फर्स्ट साजरा

**पुणे : हॅलो प्रभात**

नववर्षाच्या स्वागतासाठी पुणे शहर सज्ज झाले आहे. जुन्या वर्षांची मावळती रात्र व नव्या वर्षाची उगवती रात्र यांचा मेळ साधत थर्टी फर्स्ट शहरात सगळीकडे जोरदारपणे साजरा झाला. हॉटेल्स, पब, रिसॉर्ट्स, फार्महाऊस आणि क्लब बुधवारी रात्रीपासूनच फुल्ल झाले होते. सायंकाळी ६ वाजेपासून पार्टीचा माहोल सुरू झाला तो रात्री उशीरापर्यंत सुरूच होता. रात्री बरोबर १२ वाजता त्यावर जल्लोषाचा कळस चढला.



तरुणाईमध्ये नववर्ष सेलिब्रेशनबाबत प्रचंड उत्सुकता पाहायला मिळाली. डिसेंबरच्या सुरुवातीलाच अनेक ठिकाणी बुकिंग 'फुल' झाल्याचे चित्र होते. संगीत, नृत्य, लाईव्ह बँड, डी.जे. नाईट, थीम पार्टी यांचे आयोजन करण्यात आले होते. कोरेगाव पार्क, वाकड, बाणेर, हडपसर, हिंजवडी, कर्वेनगर तसेच पाषाण परिसरातील हॉटेल्स व पबमध्ये आकर्षक थीम पार्ट्यांचे आयोजन केले होते. काही ठिकाणी 'बॉलीवूड नाईट', 'रेनबो पार्टी', 'रेट्रो थीम', तर काही ठिकाणी 'फॅमिली न्यू इयर डिनर'चे पर्याय देण्यात आले आहेत. याशिवाय शहराच्या बाहेरील लोणावळा, मुळशी, भोर परिसरातील रिसॉर्ट्समध्ये दोन दिवसांच्या 'न्यू इयर पॅकेज'लाही मोठी मागणी आहे. मित्रमंडळींसोबत वर्षाचा शेवट जल्लोषात साजरा करण्याची मानसिकता असल्याने खर्चाची तमा न बाळगता अनेकांनी आधीच बुकिंग केले होते. 'वर्षभर अभ्यास आणि कामाचा ताण असतो. त्यामुळे नववर्षाचे स्वागत ही एक संधी असते, जिथे मित्रांसोबत मनसोक्त एन्जॉय करता येते," असे महाविद्यालयीन विद्यार्थी ओंकार शिंदे याने सांगितले.

महिला सुरक्षेच्या दृष्टीनेही आयोजकांकडून विशेष काळजी घेतली जात आहे. काही ठिकाणी महिला सुरक्षा कर्मचारी, सीसीटीव्ही, तसेच 'सेफ ड्रॉप' सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'महिलांसाठी सुरक्षित वातावरण देण्यास आमचे प्राधान्य आहे. यंदा कुटुंबीयांसाठी वेगळे आयोजन केले आहे," असे एका नामांकित हॉटेलच्या व्यवस्थापकांनी सांगितले. दुसरीकडे, पुणे पोलिसांकडूनही ३१ डिसेंबरच्या रात्री कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई, नाकाबंदी, तसेच प्रमुख चौकांमध्ये अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात होता. 'नागरिकांनी नियमांचे पालन करून सुरक्षित पद्धतीने नववर्ष साजरे करावे,' असे आवाहन वाहतूक पोलिस विभागातील अधिकारी करत होते.

# 'सुड शकारंभ' चित्रपटाचा थरारक पोस्टर प्रदर्शित

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गावाच्या मातीतील सत्ता, अहंकार, सूड आणि संतापाची ज्वाला उलगडणारा दमदार मराठी ॲक्शन-ड्रामा-थ्रिलर 'सुड शकारंभ' येत्या १६ जानेवारी २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये रक्ताने माखलेला हात दगड घट्ट पकडलेला दिसत असून, तो सूड आणि हिंसक संघर्षाचं प्रतीक ठरतो. शोएब खतीब लिखित-दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती ज्योती पाटील प्रस्तुत आणि राजनील फिल्म प्रोडक्शन यांनी केली आहे. चित्रपटात मनीषा मोरे, आयुष उलघडे, ओम पानस्कर यांच्यासह अनेक कलाकारांच्या दमदार भूमिका आहेत. ग्रामीण राजकारणाच्या पार्श्वभूमीवर सूडाची धग दाखवणारा हा चित्रपट प्रेक्षकांना थरारक अनुभव देणार आहे.

■ १६ जानेवारीला प्रेक्षकांच्या भेटीला




# भाजपच्या बालेकिल्ल्यात आव्हान कोणाचे?

### प्रभाग पाच मध्ये चर्चेला उधाण : वडगाव शेरी प्रभागात मतदारांची उत्सुकता शिगेला

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके

भाजपचा बालेकिल्ला म्हणून पाहिल्या जाणाऱ्या वडगावशेरी-कल्याणीनगर प्रभाग क्रमांक पाचमधून भाजपच्या बालेकिल्ल्यातील उमेदवारांना इतर कोणत्या पक्षातील उमेदवार आव्हान देणार? ही महत्वाची चर्चा प्रभागातील मतदारांमध्ये रंगली आहे.

पुढील महिन्यात होणारी आगामी पालिका निवडणूकीमध्ये वडगाव शेरी-कल्याणीनगर प्रभाग क्रमांक पाचमधील होणारी निवडणूक सर्व राजकीय पक्षातील नेत्यांनी प्रतिष्ठेची मानली असल्याने दोन दिवसापूर्वी विविध पक्षातील पक्षश्रेष्ठींकडून उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आल्याने उमेदवारी मिळालेल्या उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत असतानाच उमेदवारी न मिळालेल्या अनेक इच्छुक उमेदवारांच्या डोळ्यात अश्रू अनावर होऊन नाराजीचे सूर उमटले असतानाच अनेक पक्षातील वरिष्ठ राजकीय नेत्यांनी उमेदवार निवडून येण्यासाठी कार्यकर्त्यांची मूठ बांधून अनेक उमेदवारांना कानमंत्र दिल्याने पक्षाकडून एबी फॉर्म मिळालेल्या उमेदवार उत्सुक असल्याचे दिसून येत असतानाच त्यांनी देखील पक्षाची प्रतिष्ठा राखण्याबरोबरच मतदारांच्या गाठीभेटी घेऊन उमेदवारांना केलेल्या विकासकामांची पावती दाखवत आपणच विजयाचे दावेदार असल्याचे दाखवून देत आहेत.




मात्र सध्या वडगाव शेरी मतदार संघात राजकीय नेत्यांच्याच नव्हे तर मतदारांच्या देखील नजरा लागून राहिल्या असून पंधरा वर्षांपूर्वी भाजप पक्षाचे या प्रभागात कोणत्याही प्रकारचे वर्चस्व नसताना देखील त्यावेळेस पक्षाने माजी नगरसेवक योगेश मुळीक यांच्यावर विश्वास ठेवून मुलिकांच्या रूपाने वडगाव शेरी प्रभागात उमेदवार उतरविल्यावर त्यावेळेस मतदार संघावर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व असताना देखील तेव्हा मुळीक यांच्यासमवेत कार्यकर्त्यांचा फौजफाटा नसताना देखील त्यावेळेस त्यांच्या विरोधात काँग्रेसकडून नारायण गलांडे तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून भीमराव गलांडे हे निवडणुकीच्या रिंगणात उभे असताना देखील योगेश मुळीक यांनी या दोघा उमेदवारांना कात्रजचा घाट दाखवत विरोधकांचा पालिका निवडणुकी रिंगणात सुफडा साफ करत व त्यांना कात्रजचा घाट दाखवत प्रथमच प्रभागात भाजप पक्षाचा झेंडा फडकविण्यास यश मिळविले होते. तेव्हापासून मुळीक यांनी देखील जनतेच्या विश्वासाला तडा जाऊन न देता प्रभागातील पाणी, रस्ते, पथदिवे आदी विकासकामे करण्यावर भर देऊन कर्नाटक राज्यातील म्हैसूर येथे देश पातळीवर उभारण्यात आलेल्या उद्यानाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी देखील प्रभागात त्या पार्श्वभूमीवरच उद्यान उभारून उद्यानात फुलराणी व विद्युत रोषणाई व गाण्यांच्या तालावर कारंजे उभारल्याने ही त्यांनी केलेल्या कामाची पावती असल्यानेच ते करत असलेल्या कार्यामुळेच ते आज युवकांच्या गळ्यातील ताईत बनले असतानाच ज्येष्ठांचे ते आधारवड बनून त्यांच्या विविध विकासकामांना त्यांचे मोठे बंधू व मतदार संघाचे माजी आमदार जगदिश मुळीक यांची देखील मोलाची साथ लाभत आहे.

मात्र हा गड ताब्यात घेण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी व काँग्रेस सेनेच्या (उबाठा)गटातील वरिष्ठ नेत्यांनी जरी कंबर कसून एकजुटीने कामास सुरुवात केली असली तरी पण भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून हा गड पुन्हा मजबूत ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहर उपाध्यक्ष नारायण गलांडे यांच्या रूपाने आपल्या ताफ्यात घेण्यात यश आल्यामुळे नारायण गलांडे यांना देखील यापूर्वीचा राजकीय प्रवाशाचा अनुभव दांडगा आहे.व भाजपचे कट्टर समर्थक महेंद्र गलांडे यांच्या पत्नीस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक प्रकाश गलांडे यांचे सुपुत्र विजय गलांडे यांच्या पत्नींना देखील पक्षात सामावून घेऊन उमेदवारी दिल्यामुळे विजय गलांडे यां च्या पत्नी यांनी देखील सासरे माजी नगरसेवक प्रकाश गलांडे यांचा राजकारणाचा वारसा जपत व त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवल्यामुळे त्यांना पक्षाकडून देखील उमेदवारी जाहीर झाल्याने ते देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यामुळे प्रभागातील असलेला भाजपचा असलेला पॅनल सध्या मजबूत झाल्याचे दिसून येत आहे. विशेष करून नारायण गलांडे यांना देखील यापूर्वीचा.

राजकरणाचा दांडगा अनुभव त्यांच्या पाठीशी असून हा गड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात घेण्यासाठी मतदार संघाचे आजी-,माजी आमदार सुनील टिंगरे व बापूसाहेब पठारे यांच्यासह इतर पक्षांनी देखील एकजूट करून उमेदवार उभे केले असले तरी पण भाजप पक्षातील उमेदवारांचे असलेले मोठे आव्हान पेलवणे हे विरोधकांच्या उमेदवारासमोर कठीण असले तरी पण प्रभागातून सेनेचे(उबाठा)चे माजी नगरसेवक सचिन भगत व त्यांच्यासमवेत ॲड. सतीश मुळीक यांना प्रथमच आघाडीकडून उमेदवारी मिळाल्यामुळे हे दोन्ही उमेदवारांसह इतर ही उमेदवार भाजपच्या उमेदवारांना कडवे आव्हान देण्याची शक्यता नाकारता येत नसली तरी पण गेल्या पंधरा वर्षाच्या कालावधीत योगेश मुळीक यांनी प्रभागात केलेली विकासकामे तसेच प्रभागाचा केलेला कायापालट हे सर्व काही सांगून जात असून मुळीक यांच्या बरोबर कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात असलेला फौजफाटा व राजकारणातील जगदिश मुळीक यांची गनिमी काव्याने असलेली रणनिती ही गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत इतर पक्षातील कोणत्या ही राजकीय नेत्यास असलेली रणनिती पार करण्यास यश न आल्याचे स्पष्ट दिसत असतानाच सध्या प्रभागात भाजपचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे. त्यातच नव्याने या प्रभागास कल्याणीनगर या उच्चभ्रू सोसायटीसह महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड हा भाग देखील जोडला गेल्याने कल्याणीनगर या भागात भाजप पक्षाला मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येत असले तरी पण भाजपच्या या बालेकिल्ल्याला खिंडार पाडण्यासाठी इतर पक्षातील राजकीय नेत्यांनी रात्रीचा दिवस केला आहे.

मात्र त्यांच्या या प्रयत्नांना कितपत यश मिळणार हे देखील तेवढेच निर्णायक ठरणार असले तरी पण तरी पण गेल्या पंधरा वर्षे प्रभागात असलेल्या भाजपच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावण्यास विरोधकांना यश आले तर हे रेकॉर्ड ब्रेक होऊन राजकारणात प्रभागाचा इतिहास होणार असला तरी पण भाजपच्या उमेदवारांना कमी लेखून चालणार नसून प्रत्येक उमेदवारांना यापूर्वी झालेल्या पालिका निवडणुकीसह विधानसभा व लोकसभा निवडणुकीचा दांडगा अनुभव असल्यामुळेच व असलेला बालेकिल्ला हिसकावून घेण्यात विरोधकांना सहजासहजी नसल्याचे दिसून येत असल्याने प्रभागात भाजप पक्षाचेच पारडे जड मानले जात असल्याने कोणत्या पक्षातील उमेदवार भाजपच्या उमेदवारांना कडवे आव्हान देणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्यामुळे प्रभागात आता कोण? गुलाल उधळणार याची उत्सुकता मतदारांची शिगेला पोहचली असल्याचे प्रभागात मतदारांमध्ये दिसून येत आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक , मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात,** कार्यालय, **स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **पुणे संपर्क : ८५५१०५५११३**
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर

# आणखी एका न्यायालयीन लढ्यात धनंजय मुंडेंचा विजय!

**पुणे : हॅलो प्रभात** : माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा आणखी एका न्यायालयीन लढ्यात विजय झाला आहे. विधानसभा निवडणूक २०२४ मधील त्यांच्या उमेदवारी अर्ज सोबत जोडलेल्या शपथपत्रामध्ये उल्लेख केलेल्या माहितीवर आक्षेप घेत लोकप्रतिनिधी अधिनियम कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी परळी वैद्यनाथ यांच्या न्यायालयात करुणा शर्मा यांनी फौजदारी कारवाई करण्याबाबत फिर्याद प्रकरण दाखल केले होते. याबाबत आज परळी न्यायालयाने निकाल दिला असून सदर प्रकरणातील सर्व आरोप तथ्यहीन असल्याने ते फेटाळून लावले आहेत. धनंजय मुंडे यांच्या नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद माहितीवरून करुणा शर्मा यांनी वेगवेगळे आरोप करत शपथपत्रात खोटी माहिती दिल्याचा आरोप करत लोकप्रतिनिधी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. याप्रकरणी परळीच्या प्रथमवर्ग न्यायालयात सुनावणी पार पडली, करुणा शर्मा यांनी नोंदवलेला जबाब, वकिलांचा युक्तिवाद यांसह वस्तुस्थिती लक्षात घेत न्यायालयाने करुणा शर्मा यांनी दाखल केलेली फिर्याद फेटाळून लावली आहे. धनंजय मुंडे यांच्यावतीने ॲड. अशोक कवडे यांच्यासह ॲड. हरिभाऊ गुट्टे यांनी काम पाहिले. दरम्यान धनंजय मुंडे यांच्या बाजूने न्यायालयाने आणखी एक निकाल दिला आहे. याआधी देखील कृषी विभागाच्या खरेदी वरून निरनिराळे आरोप करत धनंजय मुंडे यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये देखील कोणतेही तथ्य आढळले नाही आणि ते प्रकरण देखील मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावत तक्रारदाराला उलट दंड लावला होता.

## थोडक्यात पण महत्वाचे



### तब्बल २ हजार पुणेकरांची एकत्रित श्रीराम जन्मभूमी अयोध्या यात्रा

**पुणे : हॅलो प्रभात**

धार्मिकतेतून विधायकतेकडे यशस्वी वाटचाल करीत असलेल्या अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने समाजातील सुमारे २ हजार भाविकांसाठी हिंदूंचे पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथे श्री रामलल्ला व धर्मध्वज दर्शनासाठी मोफत तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले. नुकतेच हडपसर रेल्वे स्थानक येथून यात्रेला प्रारंभ झाला. यावेळी अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, शंभूराज खुटवड, ट्रस्टचे विश्वस्त अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव आदी उपस्थित होते. अयोध्येतील श्रीराम मंदिरासह विविध ठिकाणी भेट देण्यात येत आहे. या यात्रेमुळे समाजातील सर्व स्तरातील नागरिकांना प्रभू श्रीरामलल्लांच्या दर्शनाचा लाभ मिळत असून भाविकांमध्ये मोठा उत्साह व भक्तिभाव पाहायला मिळत आहे. यात्रेच्या संपूर्ण नियोजनामध्ये भाविकांची सुरक्षितता, निवास, भोजन व प्रवासाची योग्य व्यवस्था ट्रस्टच्या वतीने करण्यात आली आहे. ट्रस्टचे विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकाला प्रभू श्रीरामलल्लांच्या दर्शनाचा लाभ मिळावा, या हेतूने अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्टच्या वतीने या मोफत अयोध्या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिकतेतून सामाजिक ऐक्य, सद्भावना व विधायक विचार रुजावेत, हीच यामागील भावना आहे.

### प्रभाग क्र. ३६, ३७, ३८ मधून २४२ अर्ज दाखल

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी (दि.३०) राजकीय वातावरणात मोठा हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. धनकवडी-सहकार नगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. ३६, ३७ आणि ३८ मध्ये एकाच दिवसात तब्बल १८३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. राजकीय पक्षांमधील एबी फॉर्मचा सस्पेन्स आणि जागा वाटपाचा तिढा शेवटच्या क्षणापर्यंत कायम राहिल्याने इच्छुकांची मोठी धावपळ उडाली. निवडणूक निर्णय अधिकारी सुप्रिया करमरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी तीन वाजेपर्यंत नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात आली. गेल्या आठवड्याभरापासून संथगतीने सुरू असलेल्या या प्रक्रियेने आज अचानक वेग घेतला. प्रभाग क्र. ३६ (सहकारनगर-पद्मावती): आज ६१ अर्ज आले त्यांनतर एकूण संख्या ८५ झाली. प्रभाग क्र. ३७ (धनकवडी-कात्रज डेअरी): आज ४२ अर्ज आल्याने एकूण संख्या ४९ वर पोहोचली. प्रभाग क्र. ३८ (बालाजीनगर-आंबेगाव) : येथे सर्वाधिक चुरस असून ७८ नव्या अर्जांसह एकूण आकडा १०८ झाला. निवडणूक निर्णय अधिकारी सुप्रिया करमरकर, सहायक अधिकारी सुरेखा भणगे, मनीषा भुतकर आणि त्यांच्या पथकाने ही प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. आता, ३१ डिसेंबरला अर्जांची तांत्रिक छाननी केली जाणार आहे.

### ठाण्यावर कॅन्डल मार्च; आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी

**पुणे : हॅलो प्रभात**

मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ आणि आरोपींना कठोरात कठोर शिक्षा, फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी खोपोलीत सोमवारी (दि. २९) कॅन्डल मार्च काढण्यात आला. आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली साईबाबानगर येथून खोपोली पोलीस ठाण्यापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी मंगेश काळोखे यांच्या कुटुंबीयांसह हजारो नागरिक सहभागी झाले होते. कॅन्डल मार्चदरम्यान संपूर्ण परिसरात तीव्र संतापाचे वातावरण होते. मंगेश काळोखे यांना न्याय मिळालाच पाहिजे, मारेकऱ्यांना फाशी द्या, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विशाल नेहूल पाटील यांना आंदोलकांच्या वतीने निवेदन देण्यात आले. आमदार महेंद्र थोरवे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, हत्येप्रकरणात काही आरोपींना अटक झाली असली तरी अद्यापही कटामध्ये सहभागी असलेले काही आरोपी मोकाट आहेत.

# अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी

**पुणे : हॅलो प्रभात**



पेरणे फाटा येथे १ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांतता आणि उत्साहात साजरा व्हावा यासाठी आवश्यक सर्व सुविधा प्रशासनातर्फे उपलब्ध करून देण्याची पूर्वतयारी करण्यात आली असून सोहळ्याच्या नियोजनासाठी प्रशासन सज्ज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

श्री. डुडी म्हणाले, दरवर्षी साजरा होणारा विजयस्तंभ अभिवादन सोहळा हा महत्वाचा कार्यक्रम आहे. यावर्षी अधिक अनुयायी येण्याचे गृहीत धरून सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. सर्व अनुयायांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, म्हणून प्रशासन योग्य ती दक्षता घेत आहे. नियोजन करताना विविध संघटना आणि नागरिकांच्या सूचनाही लक्षात घेण्या आल्या आहेत. सोहळा शांतता, संयम आणि त्याच उंचीने साजरा करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही श्री. डुडी यांनी केले.

जिल्हापरिषदेच्यावतीने २३ आरोग्य केंद्र, ४३ रुग्णवाहिका, १८ खासगी रुग्णालयातील २८६ खाटा आरक्षित, १५५ प्रशिक्षित मनुष्यबळ, उपहारगृह व टँकरकरिता ३३ तपासणी पथके, ८० घंटागाडी, शुद्ध पाण्याची व्यवस्थेसाठी १५० टँकर्स, पाणी भरण्याच्या ठिकाणी २०० कर्मचारी नियुक्त, २ हजार ८०० शौचालय, २६५ सफाई कामगार, २६० पर्यवेक्षण अधिकारी व कर्मचारी, ९ हिरकणी कक्ष आदी सुविधा करण्यात आल्या आहेत. पेरणे, कोरेगाव भिमा ते पिंपळे जगताप रस्ता, ढरंगेवस्ती, कोरेगाव भिमा ते वाडेवस्ती आदी ठिकाणी रस्ते दुरुस्ती, पिण्याच्या पाणी भरण्याचे ठिकाणी मुरुम भरण्यासह शोषखड्डा करण्यात आले आहेत.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी १ महानिरीक्षक, ३ पोलीस उपमहानिरीक्षक, २० पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी, ८ राज्य राखीव पोलीस दल तुकड्या, ३ शिघ्र प्रतिसाद दल, १४ घातपात विरोधी पथक, १८ बीडीडीएस पथके, ६५० होमगार्ड, ४ हजार ७०० पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. संपूर्ण सोहळ्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता फेस रिकगनायजेशनकरिता २५१ ठिकाणी अत्याधुनिक सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. १९ ठिकाणी वाहनतळाच्या माध्यमातून २० हजार चारचाकी वाहनाची पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने ४ पोलीस उपायुक्त, ८ सहायक पोलीस उपायुक्त, ४५ पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक एकूण १७१, १ हजार ३२५ अंमलदार, वार्डन व होमगार्ड एकूण ६५०, २ सर्व्हेलन्स व्हॅन, ३ आरसीपी आणि १ शिघ्र प्रतिसाद दलातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालयाच्यावीने कायदा व सुवव्यस्थेच्यादृष्टीने शिरुर तालुक्यातील वढू बु. येथील छत्रपती शंभाजी महाराज व गोविंद गोपाळ महाराज यांच्या समाधीस्थळी अनुयायी दर्शनासाठी येतात. यादृष्टीने गर्दीवर नियंत्रण आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता कोरेगाव भिमा, वढु. बु. व शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत बंदोबस्ताकरिता ३३ वरिष्ठ पोलिस अधिकारी, ३३२ इतर पोलिस अधिकारी, ३ हजार १० पोलिस अंमलदार, १ हजार ५०० होमगार्ड, ४ राज्य राखीव पोलीस दल तुकड्या, १० स्ट्रायकींग फोर्स, ४ आरसीपी पथक, २ शिघ्र प्रतिसाद दल आणि ७ बीडीडीएस पथके नेमण्यात आली आहेत.

सुरक्षेच्या व निगराणीच्या दृष्टीने पोलिस विभागामार्फत सीसीटीव्ही कॅमेरे, ड्रोन कॅमेरे तसेच ध्वनीक्षेपण यंत्रणा आदी सुविधा करण्यात आली आहे. वाहनतळाचे ठिकाण, पिकअप व ड्रॉपचे ठिकाण, वॉच टॉवर्स, पोलीस मदत केंद्र, वज्र मोबाईल आदी व्यवस्था करण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीसाठी अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथके आदी यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

अहिल्यानगरमार्गे येणाऱ्या अनुयायांच्या वाहनांकरिता वक्फ बोर्ड तसेच मुंबई-नाशिक रोडकडून येणाऱ्या अनुयायांकरीता टोरंटो गॅस वाहनतळ आणि जातेगाव खु. चाकणरोड येथे, तर पोलीस व प्रशासन यांच्या वाहनांकरीता तोरणा वाहनतळ येथे व्यवस्था करण्यात आली आहे. कोरेगाव-भिमा येथून वढू बु. याठिकाणी जाणाऱ्या अनुयायांकरीता इनामदार पार्किंग, कोरेगाव भिमा येथून पीएमपीएमएलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पोलीस दलाच्यावतीने वाहतूक वळविण्याबाबत आदेश पारित केले आहेत.

**पीएमपीएलच्यावतीने ३१ डिसेंबर २०२५ रोजी ३७५, तर १ जानेवारी २०२६ रोजी १ हजार २६० पीएमपीएल बसेसचे नियोजन केले आहे. प्रत्येक बसवर दोन कर्मचारी, राखीव चालक, तांत्रिक कर्मचारी मिळून अशी ४ हजार २०० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. बार्टीच्यावतीने एकूण ३१० बुक स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने विजयस्तंभाला फुलांची सजावट, विद्युत रोषणाई, परिसर डागडुजी, पत्रकार कक्ष, मंडप, परिसर सुशोभिकरण आदी व्यवस्था करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, महावितरणने परिसरात विद्युत पुरवठा करण्यात आला आहे.**

# शेकडो नाट्यरसिकांनी घेतली मतदानाची शपथ

**पिंपरी : हॅलो प्रभात**



कलाकारांच्या शब्दांतून आणि रसिकांच्या सहभागातून मतदानाचे महत्त्व अधोरेखित करीत, लोकशाहीचा मूलमंत्र नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह येथे मतदान जनजागृती उपक्रम पार पडला. कला, संस्कृती आणि लोकशाही यांचा सुरेल संगम साधत, रंगमंचाच्या माध्यमातून दिलेला मतदानाचा संदेश नागरिकांच्या मनात रुजवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले आणि अभिनेत्री कविता मेढेकर यांनी देखील सहभागी होत आगामी महापालिका निवडणुकीत मतदान करण्याचे नागरिकांना आवाहन केले. पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक जाहीर झाली असून, या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह येथे 'एका लग्नाची पुढची गोष्ट...' या नाट्यप्रयोगाच्या वेळी मतदान जनजागृती उपक्रम राबवण्यात आला.

# ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयात गर्दी

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत प्रभाग क्र. १३ आणि प्रभाग क्र. १४ साठी ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ही मतदान केंद्रे निश्चित झाली आहेत. यानुसार प्रभागातील उमेदवारांनी आपले अर्ज सोमवारी आणि मंगळवारी येथे दाखल केले. अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस असल्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दुपारी अनेक इच्छुक उमेदवारांना टोकण दिले होते त्यामुळे अर्ज स्विकारल्यानंतर त्याची पडताळणी रात्री उशीरापर्यंत सुरू होती, यामुळे एकुण किती अर्ज स्विकारले गेले याच निश्चीत आकडेवारी समजू शकली नाही, बुधवारी ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालय निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकांत खरात यांच्याकडून अंतिम आकडेवारी सांगण्यात येईल.

# जाहिरात फलकावर कारवाईचे अधिकार मात्र क्षेत्रीय कार्यालयांनाच

**पुणे : हॅलो प्रभात**


शहरात जाहिरात फलक उभारण्याचे अधिकार पुन्हा महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांकडे देण्यात आले आहेत. प्रशासकीय कामकाज गतिमान करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी हे अधिकार क्षेत्रीय कार्यालय स्तरावर महापालिका सहाय्यक आयुक्तांसह, परिमंडळ उपायुक्तांना दिले होते. मात्र, अधिकार मिळताच महिन्याभरातच तब्बल ४०० हून अधिक परवाने क्षेत्रीय कार्यालयांनी दिले असल्याचे समोर आल्यानंतर महापालिका आयुक्तांकडून तत्काळ हे अधिकार काढून घेण्यात आले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांना हे अधिकार देण्यापूर्वी महापालिका वर्षभरात केवळ २० ते २२ जाहिरात फलकांना परवानगी देत होती. आता नवीन बदलानुसार, अनधिकृत जाहिरात फलक, बोर्ड फ्लेक्स, झेंडे, तसेच आकाशचिन्ह विभागाशी संबंधित बाबींवर कारवाई करण्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांकडे कायम असणार आहेत. यापुढील नवीन जाहिरात फलक परवानगी प्रस्ताव परवाना निरीक्षक यांच्यामार्फत उपआयुक्त, परवाना व आकाशचिन्ह विभाग यांनी अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई) यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करावेत. नवीन नामफलक परवानगी प्रस्ताव परवाना निरीक्षकांनी थेट उपआयुक्त, परवाना व आकाशचिन्ह विभाग यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केले जातील.

# येरवड्यात दोन उमेदवारांचे अर्ज बाद

**पुणे : हॅलो प्रभात**

येरवडा क्षेत्रीय कार्यालयात उमेदवारी अर्ज भरलेल्या दोन उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याची माहिती समोर आली आहे.

आगामी पालिका निवडणूक पंधरा दिवसावर येऊन ठेपल्यामुळे येरवडा_धानोरी_कळस या क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक सहा,येरवडा_गांधीनगर, प्रभाग क्रमांक दोन नागपूरचाळ_टिंगरेनगर व प्रभाग क्रमांक एक धानोरी_कळस या प्रभागाचा समावेश करण्यात आल्याने या क्षेत्रीय कार्यालयात निवडणूक अधिकारी म्हणून सचिन बारवकर हे काम पाहत असून मागील आठवड्यात २३डिसेंबर २०२५पासून उमेदवारांना उमेदवारी अर्ज भरण्याचे आदेश देण्यात आले होते.तर ३०डिसेंबर हा अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने २९ व ३०डिसेंबर उमेदवारी अर्ज भरण्यासाठी राजकीय पक्षातील उमेदवारांसह अपक्ष उमेदवारांची मोठ्या प्रमाणात मांदियाळी दिसून येत असताना क्षेत्रीय कार्यालयाच्या आवारात काही अनुचित घटना घडू नये. याकरिता परिसरात पोलिस व पालिका सुरक्षा रक्षकांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तर शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयात अनेक उमेदवारांनी ढोल ताशांच्या गजरात व फटाक्याच्या आतषबाजीत उमेदवारी भरण्यास सुरुवात केली होती. परिसरात अनेक कार्यकर्त्यांची गर्दी पाहून क्षेत्रीय कार्यालयाला पोलिस बंदोबस्तामुळे छावणीचे व यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. गेल्या सात दिवसापासून तीन प्रभाग मिळून तसेच राजकीय पक्षातील उमेदवारासह निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी जय्यत तयारी केलेल्या जवळपास दोनशे अठ्ठेचाळीस उमेदवारांनी उमेदवारीचे अर्ज दाखल केले होते. ३१डिसेंबर रोजी उमेदवारांच्या अर्जांची छाननी केली असता यापैकी दोन अपक्ष उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याचे निदर्शनास आले असून सध्या पालिका निवडणुकीच्या रिंगणात आता दोनशे शेचाळीस उमेदवार अर्ज वैध ठरले असले तरी पण येत्या तीन



तारखेला उमेदवारी अर्ज माघार घेण्याचा दिवस असल्याने यामध्ये किती उमेदवार आपले उमेदवारी अर्ज माघारी घेणार असल्याने काही उमेदवारांनी अर्ज माघारी घेतल्यास निवडणुकीच्या रिंगणात अपक्षासह किती उमेदवार पालिका निवडणुकीच्या रिंगणात राहणार हे स्पष्ट होणार असल्याने सर्व राजकीय नेत्यांसह कार्यकर्त्यांच्या नजरा देखील येत्या तीन तारखेकडे लागून राहिल्या आहेत.

# कोयना भूकंप निधीतून ५ कोटी २९ लक्ष निधी मंजूर

- पाटण विधानसभा मतदारसंघातील ३४ गावांतील अंतर्गत रस्त्यांचा प्रश्न लागणार मार्गी

**सातारा : हॅलो प्रभात**

सूर्यकांत पाटणकर



पाटण विधानसभा मतदारसंघातील विविध गावांतील अंतर्गत रस्त्यांच्या कामांना निधी मंजूर होण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे पर्यटन,खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री तथा सातारा जिल्हयाचे पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांनी कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिती न्यासाकडे शिफारस केली होती.

पाटण विधानसभा मतदारसंघातील अंतर्गत रस्त्यांच्या कामांना कोयना भूकंप पुनर्वसन निधी समितीमधून ५ कोटी २९ लाख ०६ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याचा शासन निर्णय राज्य शासनाचे महसूल व वन विभागाने पारित केला असल्याची माहिती पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांचे कार्यालयाचेवतीने प्रसिध्दीपत्रकां दिली आहे.

प्रसिध्दीपत्रकांत पुढे म्हंटले आहे की, पाटण विधानसभा मतदारसंघात विविध गावांतील अंतर्गत रस्ते खराब झाले असल्याने या कामांना निधी मंजूर होण्यासंदर्भात पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांचेकडे या विकास कामांची मागणी केली होती.पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांनी कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिती न्यासाकडे शिफारस केल्यानुसार पाटण विधानसभा मतदारसंघातील ३४ अंतर्गत रस्त्यांच्या कामांना कोयना भूकंप पुनर्वसन निधी समितीमधून ०५ कोटी २९ लाख ०६ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याचा शासन निर्णय राज्य शासनाचे महसूल व वन विभागाने पारित केला आहे.

यामध्ये तोरस्करवाडी नाणेगाव स्मशानभूमी रस्ता सुधारणा १५ लक्ष,धायटी येथे खुडेवाडी अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, पाठवडे अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, बोर्गेवाडी डेरवण अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, पाबळवाडी अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, फडतरवाडी घोट स्मशानभूमी रस्ता सुधारणा १५ लक्ष, नुने मातंगवस्ती रस्ता सुधारणा १५ लक्ष, मारुल तर्फ पाटण रस्ता सुधारणा १५ लक्ष, मल्हारपेठ दिंडुकलेवाडी येथे स्मशानभूमी पर्यंतचा रस्ता सुधारणा १५ लक्ष, विहे गणेश साबळे घर ते हिंदुराव जंबुरे घर रस्ता सुधारणा २० लक्ष, केरळ गुजर आवाड ते खाशाबा पवार यांचे घर रस्ता सुधारणा १५ लक्ष,खालची मेंढोशी जगदिश जाधव यांचे घर ते बापूराव जाधव यांचे घर रस्ता सुधारणा १५ लक्ष, लुगडेवाडी केरळ लुगडेवाडी ते माऊलीमंदिर रस्ता सुधारणा 15 लक्ष, फणसवाडी वाटोळे अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, प्र. जि.मा. २९ ते भिकाडी गाव पोच रस्ता खडीकरण डांबरीकरण २५ लक्ष, कवडेवाडी अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, कोळेकरवाडी येथे अंतर्गत रस्ता १४.९८ लक्ष, हौदाचीवाडी जिंती रस्ता सुधारणा २० लक्ष, नाटोशी टकलेवाडी शिर्केवस्ती अंतर्गत मातंगवस्ती रस्ता सुधारणा १५ लक्ष,मोरेवाडी पेठशिवापूर येथे रस्ता सुधारणा १४.८६ लक्ष,आंब्रग अंतर्गत रस्ता सुधारणा १९.८२ लक्ष,गुंजाळी अंतर्गत रस्ता सुधारणा १९.८२ लक्ष,त्रिपुडी स्मशानभूमी पोहोच रस्ता सुधारणा ५ लक्ष, नेरळे जि प शाळा पाठीमागील रस्ता सुधारणा १४.८६ लक्ष, मुळगाव अंतर्गत रस्ता सुधारणा १४.८६ लक्ष, तळीये पूर्व वसंत बाबर ते स्मशानभूमी रस्ता सुधारणा १४.८६ लक्ष, शिद्रुकवाडी कोरिवळे ते भराडीदेवी रस्ता सुधारणा १० लक्ष, चोपदारवाडी सिध्देश्वरनगर अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, पापर्डे गारवडे मोरगिरी रस्ता ते भगवान किसन पाटील पर्यंत रस्ता सुधारणा १५ लक्ष, बहुले पोपट शेट घर ते जोतिबा मंदिर रस्ता सुधारणा १५ लक्ष, मरळी स्टँड ते लोकरेवस्ती अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, सांगवड कोळीवस्ती रस्ता सुधारणा २० लक्ष, तामिणे अंतर्गत रस्ता सुधारणा १५ लक्ष, नावडी अंतर्गत रस्ता सुधारणा २० लक्ष या कामांचा समावेश आहे. सार्वजनिक बांधकाम,जिल्हा परिषद बांधकाम विभाग या कार्यान्वित यंत्रणांचे माध्यमातून ही कामे मार्गी लागणार असल्याने या कामांची तातडीने निविदा प्रक्रिया करण्याच्या सूचनाही यावेळी संबंधित अधिकारी यांना केल्या असल्याची माहिती प्रसिध्दीपत्रकांत दिली आहे.

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष गुरुवार, दि. ०१ जानेवारी २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे




### स्वीकृत नगरसेवक पद कोल्हाटी समाजाला देण्याची मागणी

**आष्टा-उमेश वरणे : हॅलो प्रभात**

आष्टा नगरीतील कोल्हाटी समाज हा प्रामाणिक, निष्ठावंत व जबाबदारीने काम करणारा समाज म्हणून ओळखला जातो. यंदाच्या नगरपरिषद निवडणुकीत कोल्हाटी समाजाने संघटित भूमिका घेत आपली राजकीय ताकद दाखवून दिली आहे. मात्र प्रत्येक निवडणुकीत दुर्लक्षित राहणाऱ्या या समाजाला यंदा न्याय मिळावा, अशी जोरदार मागणी समाजबांधवांकडून होत आहे. भटक्या जमाती 'ब-१५' मध्ये समाविष्ट असलेल्या कोल्हाटी समाजाने स्वच्छता, शहरविकास, शिक्षण व समाजउत्थानात मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे आष्टा नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवक पदावर कोल्हाटी समाजातील प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकर्त्याची नियुक्ती करावी, अशी अपेक्षा समाजातील ज्येष्ठ मान्यवरांनी व्यक्त केली आहे.



### प्रजापिता ब्रह्माकुमारीतर्फे नेवासा नगराध्यक्षकांचा गौरव

**नेवासे : हॅलो प्रभात**

नेवासे येथील श्री ज्ञानेश्वर कॉलेज परिसरातील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, ओम शांती केंद्राच्या वतीने नेवासा नगरपंचायतीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉ. करनसिंह घुले पाटील व नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला. गुजरातमधील गांधीनगर येथील ब्रह्माकुमारी वंदनीय तारादिदी यांच्या हस्ते सत्कार सोहळा पार पडला. यावेळी तारादिदींनी "गाव हे एक कुटुंब मानून सर्वांनी एकोप्याने विकासासाठी काम करावे," असा संदेश दिला. कार्यक्रमात ओम शांती केंद्राच्या प्रमुख राजयोगिनी सरलादिदी व राजयोगिनी वंदनादिदी यांच्या हस्ते तारादिदींचा शाल, पुष्पगुच्छ व शिवबाबांची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी नगराध्यक्ष डॉ. करनसिंह घुले पाटील यांच्यासह नगरसेविका जयश्रीताई शिंदे, भारती परदेशी, नगरसेवक महेश लोखंडे, प्रविण सरोदे, कृष्णाभाऊ परदेशी आदींचा सत्कार करण्यात आला. बाळासाहेब देवखिळे यांनी केंद्राच्या वर्षभर चालणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले, तर राजयोगिनी वंदनादिदी यांनी आभार मानले. उपस्थितांना प्रसाद वाटप करण्यात आले.

### बंदी असलेल्या चायना मांज्याची विक्री; शेवगावात दुकानदारावर गुन्हा

**शेवगाव : हॅलो प्रभात**

शेवगाव शहरात बंदी असलेल्या नायलॉन (चायना) मांज्याची विक्री केल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत एका दुकानदारावर गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत सुमारे १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ३० डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी गुप्त माहितीच्या आधारे शेवगाव पोलिसांनी श्रीराम कॉलनीतील गणेश किराणा अॅण्ड जनरल स्टोअर्स येथे छापा टाकला. यावेळी आरोपी सचिन गोविंदराम मुंदडा (वय ५०, रा. शेवगाव) हा नायलॉन चायना मांज्याची विक्री करताना आढळून आला. छाप्यात MONO KTC FIGHTERच्या १० चक्र्या व DOUBLE BLADEचे ६ पॅकेट्स असा एकूण १३ हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ व पर्यावरण संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शेवगाव पोलीस करीत आहेत.

### 'विशेष ग्रामसभे'चे आयोजन

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**



केंद्रीय कृषी व ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान हे राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे आयोजित विशेष ग्रामसभेला उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. केंद्र शासनाच्या वतीने प्रस्तावित असलेल्या 'विकसित भारत – जी राम जी ' या विधेयकावर चर्चा करण्यासाठी गुरुवार, १ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता या विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रामसभेत 'विकसित भारत – गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन (ग्रामीण)' अंतर्गत मनरेगाच्या विद्यमान १०० दिवसांऐवजी प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला १२५ दिवस रोजगाराची हमी, तसेच पेरणी-कापणीच्या हंगामात शेतकऱ्यांना मजूर उपलब्ध व्हावेत यासाठी शासकीय कामांमध्ये ६० दिवसांच्या 'हंगामी विराम' या तरतुदींसह महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर विचारमंथन होणार आहे. या ऐतिहासिक ग्रामसभेच्या नियोजनाचा आढावा राज्याचे जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतला. कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# शिवरायांचे गड आजही उपेक्षित

## ही अवस्था मन सुन्न करणारी : खासदार निलेश लंके

**साल्हेर : हॅलो प्रभात**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची साक्ष देणारे गड-किल्ले आजही दुर्लक्षित अवस्थेत आहेत. ऐतिहासिक वारशाची होत असलेली ही दुरवस्था मन सुन्न करणारी असून, गड संवर्धनासाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार असल्याचा ठाम निर्धार खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केला. खासदार लंके यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या 'आपला मावळा' या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून गड संवर्धन, जतन, स्वच्छता व वृक्षारोपण मोहिमेचा दहावा टप्पा आज ऐतिहासिक साल्हेर गडावर यशस्वीरीत्या पार पडला. या मोहिमेत खासदार भास्कर भगरे यांच्यासह शेकडो मावळ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. गडावरील प्लास्टिक कचरा, बाटल्या, थर्माकोल यांसारखा अपायकारक कचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच गडावरील ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन, पायवाटांची साफसफाई व ठिकठिकाणी सौरदिवे व पर्यटकांना बसण्यासाठी बेंच तसेच नामफलक लावण्यात आले. यावेळी बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, "शिवरायांचे गड म्हणजे केवळ दगड-माती नव्हे, तर तो आपला स्वाभिमान, इतिहास आणि अस्मिता आहे. या गडांची आजची अवस्था पाहून मन हेलावून जाते. सरकार, प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येऊन गड संवर्धनासाठी पुढाकार घेतला पाहिजे. 'आपला मावळा'च्या माध्यमातून हा लढा थांबणार नाही."

खासदार भास्कर भगरे यांनीही मोहिमेचे कौतुक करत गड-किल्ले जपण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची असल्याचे सांगितले.

ही मोहीम केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित नसून, युवा पिढीमध्ये इतिहासाबाबत जाणीव निर्माण करणे आणि शिवरायांचा वारसा जपण्याचा संदेश देणारी असल्याचे उपस्थित मावळ्यांनी सांगितले.

## नवीन वर्षात प्रत्येकाची संकल्प पूर्ती व्हावी : बाळासाहेब थोरात

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

विनोद जवरे

भूतकाळ हा भविष्यकाळाचा मार्गदर्शक असून प्रत्येक नवीन दिवस आणि नवीन वर्ष नवी आशा, नवी ऊर्जा घेऊन येतो. त्याप्रमाणे येणारे नवीन वर्ष 2026 हे प्रत्येकासाठी आरोग्यदायी, आनंदाचे, सुख समृद्धीचे जाऊन नवीन वर्षात प्रत्येकाची संकल्पपूर्ती व्हावी अशा शुभेच्छा काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा.महसूल व शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी दिल्या आहेत.

नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, भूतकाळ हा प्रत्येकाचा मार्गदर्शक असून त्यावर भविष्याची वाटचाल ही ठरलेली असते. नवीन वर्षामध्ये प्रत्येकाला चांगले आरोग्याबरोबर चांगले जीवनमान मिळावे यासाठी सर्वांनी काम करणे गरजेचे आहे. मागील वर्षात अनेक चांगल्या वाईट गोष्टी घडल्या आहेत. वाईट गोष्टी परत घडणार नाही काळजी प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे. आपले गाव शहर तालुका राज्य देश चांगला घडवण्यासाठी प्रत्येकाने एक चांगला संकल्प करावा.

सामाजिक बांधिलकी ठेवत संविधानाचा आणि लोकशाहीचा विचार जपत राष्ट्रहितासाठी काम करावे. मानवता हा धर्म सर्वात मोठा असून संत व समाज सुधारकांचे विचार घेऊन काम करावे. येणारे वर्ष 2026 हे सर्वांना आनंदाचे आणि संकल्पपूर्तीसह आनंददायी जावो अशा शुभेच्छा महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी दिल्या आहेत.

### सकारात्मक कामातून जीवनात आनंद व्हावा

**महाराष्ट्राची संस्कृत परंपरा जपत प्रत्येकाने आपल्या जीवनातील यश मिळवण्यासाठी पूर्ण कार्यक्षमतेने योगदान द्या. नवीन तंत्रज्ञानासह नवनिर्मितीवर भर देताना नवीन वर्ष 2026 मध्ये प्रत्येकाला चांगले आरोग्य व समाधान मिळावे अशा शुभेच्छा देताना सकारात्मक कामातून प्रत्येकाच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा असे आमदार सत्यजित तांबे यांनी म्हटले आहे.**

**- आ. सत्यजित तांबे**

## नगराध्यक्षांच्या हस्ते दिव्यांग दिनदर्शिकेचे प्रकाशन



**राहुरी : हॅलो प्रभात**

राहुरी तालुका प्रहार दिव्यांग संघटना व दिव्यांग शक्ती सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग दिनदर्शिका २०२६चे प्रकाशन नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे यांनी स्वतंत्र दिव्यांग भवनाची मागणी केली.

नगराध्यक्ष मोरे यांनी पुढील पाच वर्षांत दिव्यांग भवन उभारण्यासाठी पाठपुरावा करून ते पूर्ण करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमास विविध मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन योगेश लबडे यांनी केले तर आभार रविंद्र भुजाडी यांनी मानले.

## डी.वाय.पी.स्कूल ऑफ इंजिनिअरिंग इनोव्हर्स २.० प्रथम

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



बेळगावी येथे झालेल्या इनोव्हर्स २.० स्पर्धेत डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट च्या विद्यार्थ्यांनी प्रथम स्थान मिळवत देदीप्यमान यश मिळवले आहे.

बेळगावी येथील के. एल. एस. गोगटे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे झालेल्या इनोव्हर्स २.० या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातील ५६ संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये डी.वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे एमसीए विद्यार्थी प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले.

या स्पर्धेत 'AI-Driven Customer Churn Prediction & Personalized Retention Engine'या त्यांच्या प्रकल्पाने विशेष दाद मिळवली. या संघात केदार दुरुगडे, प्रथमेश भोसले व आदित्य जाधव यांचा समावेश होता. या यशाबद्दल डी.वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा आणि रजिस्ट्रार डॉ. व्ही. व्ही. भोसले यांच्या हस्ते त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. त्यांना संचालक डॉ.अजित एस. पाटील, विभागप्रमुख डॉ. एस. एस. गुळवणी, समन्वयक प्राध्यापक डॉ. व्ही. आय. पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले. या निवडीबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे कुलपती डॉ संजय डी पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ.ए.के.गुप्ता यांनी अभिनंदन केले.

## शिक्षण परिषदेत हक्क-कर्तव्य संतुलनाचा ठाम संदेश

**मोडनिंब : हॅलो प्रभात**

संतोष पांढरे

संविधानाने नागरिकांना दिलेले हक्क जितके महत्त्वाचे आहेत, तितकीच कर्तव्यांची जाणीव ठेवणेही आवश्यक आहे. कर्तव्यांपासून पळ काढून केवळ हक्क व अधिकारांसाठी पुढे सरसावणे योग्य नसून, प्रत्येकाने स्वतःची जबाबदारी स्वीकारणे हीच खरी स्वातंत्र्याची व्याख्या आहे. माणूस हा आयुष्याचा प्रेक्षक नसून स्वतःच्या आयुष्याचा निर्माता आहे, हे शिक्षणातून समजले पाहिजे, असे ठाम प्रतिपादन उपळाई बुद्रुक केंद्राचे केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांनी केले.ते श्री नंदिकेश्वर विद्यालय, उपळाई बुद्रुक येथे आयोजित शिक्षण परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी समाजात वाढत चाललेल्या आत्मसन्मानाच्या मुखवट्यावर टीका करत, हा मुखवटा सर्वांसाठी घातक ठरत असल्याचे नमूद केले. नवसमाज घडवायचा असेल तर शिक्षणाची कास धरावी लागेल. एकही मूल आपल्या हातून वाया जाणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येक शिक्षकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



याप्रसंगी पांडुरंग शिंदे यांनी सकारात्मक शिस्त या विषयावर मार्गदर्शन करताना सकारात्मक शिस्तीची नऊ मूलतत्त्वे, मुलांचे सहकार्य मिळवण्याच्या पायऱ्या तसेच वर्तन समस्या सोडवण्याच्या प्रभावी पद्धती याविषयी सविस्तर माहिती दिली.

नीलिमा थोरात यांनी खान अकादमी संदर्भात सखोल मार्गदर्शन करत डिजिटल शिक्षणाच्या संधी स्पष्ट केल्या. शैक्षणिक पोर्टलवरील विविध माहितीबाबत धनाजी घाडगे यांनी सकारात्मक विचार मांडले. तसेच संविधान जागृती विनोबा साठ दिवस उपक्रम याविषयी ज्येष्ठ शिक्षक विठोबा गाडेकर यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस क्रांतीज्योती माय सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमंत राऊत होते.

प्रास्ताविक वैजनाथ मोगल यांनी केले, तर आभार प्रदर्शन धनंजय नागटिळक यांनी मानले. केंद्रातील सर्व शिक्षक वेळेत उपस्थित होते.

## रुग्णालयातून बाहेर येताच माणिकराव कोकाटेंची थेट कोर्टात हजेरी

**पुणे : हॅलो प्रभात**

सदनिका घोटाळ्या प्रकरणी झालेल्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार माणिकराव कोकाटे यांनी आज रुग्णालयातून बाहेर येत जामिनासाठी न्यायालयात हजेरी लावली. यावेळी त्यांना शिक्षा आणि मंत्रिपदाबाबत विचारले असता, 'काय बोलायचं ते माझ्या वकिलांशी बोला' असे माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. १९९५ साली झालेल्या सदनिका घोटाळ्याप्रकरणी नाशिकमधील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी फेब्रुवारीत महिन्यात माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या बंधूंना दोषी ठरवत दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर डिसेंबर महिन्यात नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने ही शिक्षा कायम ठेवली होती. नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाच्या या निर्णयानंतर पोलिसांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर अटकेची कारवाई करण्यासाठी हालचाली सुरू केल्या होत्या. मात्र कोकाटे हे प्रकृती अस्वस्थ्यामुळे उपचारांसाठी रुग्णालयात दाखल झाले होते. तसेच त्यांनी शिक्षेपासून दिलासा मिळावा यासाठी मुंबई उच्च न्यायालयात आणि नंतर सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी करत कोकाटे यांना झालेल्या शिक्षेला स्थगिती दिली होती. सर्वोच्च न्यायालयाने शिक्षेला स्थगिती दिल्यानंतर जामिन अर्जावर सही करण्यासाठी माणिकराव कोकाटे आज रुग्णालयामधून थेट न्यायालयात दाखल झाले होते.

# दिव्यांगांची हेडसाळ थांबवा : डॉ. संजय घोगरे

**राहुरी : हॅलो प्रभात**

दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणी, युनिक आयडीला आधार व मोबाईल लिंक करणे तसेच नवीन प्रमाणपत्र काढण्यातील अडचणींमुळे दिव्यांगांची होत असलेली हेडसाळ थांबवावी, या मागणीसाठी प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने जिल्हा रुग्णालयातील शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांना निवेदन देण्यात आले. राज्य व केंद्र शासनाच्या नियमानुसार विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रमाणपत्र पडताळणी व युनिक आयडी अनिवार्य असल्याने दर बुधवारी जिल्हा रुग्णालयात पाच ते सहा हजार दिव्यांगांची गर्दी होत आहे. यामुळे दिव्यांगांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असून आर्थिक लूट व गैरसोय होत असल्याचा आरोप संघटनेने केला. प्रत्येक दिवशी एक तालुका याप्रमाणे तालुकानिहाय ऑनलाईन व्यवस्था व शिबिरांच्या माध्यमातून प्रमाणपत्र पडताळणी, युनिक आयडी अपडेट व नवीन प्रमाणपत्र प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अन्यथा संजय गांधी निराधार योजनेचे मानधन बंद पडण्याची भीती आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेळीच योग्य निर्णय न घेतल्यास माजी राज्यमंत्री बच्चूभाऊ कडू यांच्या मार्गदर्शनाखाली उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

